तारापूर एज्युकेशन सोसायटीचे गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक विद्यालय तारापूर

## तारापूर एज्युकेशन सोसायटी आभासी वार्षिक सर्वसाधारण सभा (आंतरजालाद्वारे)

रविवार दि.२६ सप्टेंबर २०२१

वार्षिक अहवाल सन २०२०-२०२१

तारापूर एज्युकेशन सोसायटी संचलित गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक विद्यालय तारापूर सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. या शैक्षणिक वर्षात पूर्व प्राथमिक विद्यालयाने ३७व्या वर्षात पदार्पण केले आहे.

सन २०२०-२०२१ या काळात कोरोनाच्या प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यार्थ्यांचा अभ्यास आम्ही व्हॉटस्अॅप या माध्यमाद्वारे घेण्याचे ठरविले.

विद्यार्थ्यांची वर्गवारी ग्रुप तयार करून सूचना देण्यात आल्या आणि व्हॉटस्अॅपद्वारे ऑनलाईन अभ्यास देण्यास सुरुवात केली. विद्यार्थ्यांनी तो अभ्यास तयार करून शिक्षकांना व्हॉटस्अॅपवर पाठवावा व तो अभ्यास शिक्षक तपासणार. तसेच गाणी भजन प्रार्थना व इतर गीते शिक्षकांच्या आवाजात ऑडिओ तयार करून ग्रुपवर पाठविले. पालकांनीही त्याला चांगला प्रतिसाद देऊन विद्यार्थ्यांचे गाणे प्रार्थना म्हणतानाचे व्हिडिओ पाठविले. अशा प्रकारे ऑनलाईन अभ्यास सुरु आहे.

सन २०२०-२०२१ या शैक्षणिकवर्षात नविन प्रवेश खालील प्रमाणे आहेत.

शिशूवर्ग २१ विद्यार्थी संख्या.

बालवर्ग ४४ विद्यार्थी संख्या.

प्लेग्रुप ०३ विद्यार्थी संख्या.

एकूण विद्यार्थी संख्या ६८ आहे.

सौ.कविता कैलास दवणे.

गोपाळ शिवराम वर्वे पूर्व प्राथमिक विद्यालय.